महाराष्ट्र अक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture, Mumbai
Office of the Directorate of Medical Education and Research, Government Dental College Building
4th Floor, St. Georges' Hospital Campus, P. D'Mello Road, Fort, Mumbai-400 001, Maharashtra (India)
Tel. : +91-22-22620376 | Web. : www.mahacucouncil.org. | E-mail: mahacucouncil@gmail.com

क्र.मअॅप/सुचना/ऑनलाईन पडताळणी/मुदतवाढ/ ५४ /२०२० दि. १०/११/२०२०

# जाहिर सूचना

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अक्यूपंचर चिकित्सा पद्धती अधिनियम २०१५ अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र ॲक्युपंचर परिषदेकडे राज्यातील व राज्याबाहेरील ॲक्युपंक्चर व्यावसायिकांची नाव नोंदणी करण्यासाठी परिषदेतर्फे दि. १ जानेवारी २०२० ते ३० जुलै २०२० पर्यंत ऑनलाईन कागदपत्र पडताळणी प्रक्रिया राबविण्यात आली होती.

कागदपत्र पडताळणी प्रक्रियेच्या अंतिम तारखे नंतरही परिषदेच्या ई-मेल तसेच दूरध्वनीद्वारे ऑनलाईन कागदपत्र पडताळणीसाठी परवानगी देण्यासाठी वारंवार नोंदणी न करु शकलेल्या ॲक्युपंक्चर व्यावसायीकांकडून विनंती करण्यात येत असल्याने सदर विषय परिषदेच्या दिनांक ८ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या बैठकीत मांडण्यात आला होता.

परिषदेच्या बैठकीत सविस्तर चर्चा करुन ॲक्यूपंक्चर व्यावसायीकांचे हित लक्षात घेऊन ॲक्युपंक्चर व्यावसायिकांच्या ऑनलाइन कागदपत्र पडताळणीसाठी रु.३०००/-शुल्काव्यतिरिक्त रु.५०००/- दंडनीय शुल्क आकारुन (रु.५०००/- दंड + रु.३०००/- शुल्क= एकुण रु.८०००/-) विशेष बाब म्हणून अंतीम परवानगी देण्याचे परिषदेने सर्वानुमते ठरविले.

त्यानुसार ऑनलाइन कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया **दिनांक ११ नोव्हेंबर २०२० ते १५ डिसेंबर २०२०** दरम्यान राबविण्यात यावी व यानंतर कोणत्याही परिस्थितीत कागदपत्र पडताळणीसाठी मुदतवाढ/परवानगी देऊ नये असेही सर्वानुमते बैठकीत ठरले, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

सर्व ॲक्युपंक्चर व्यावसायीकांनी वरील कालावधीत ऑनलाईन कागदपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करण्याची विनंती करण्यांत येत आहे.

(डॉ.रुमी बेरामजी)
अध्यक्ष
महाराष्ट्र अक्युपंचर परिषद मुंबई

दिनांक : १०/११/२०२०
स्थळ : मुंबई

Scanned with CamScanner